नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


# प्रेस नोट

**दिनांक ०४/१२/२०२३ (सोमवार )**

## जबरी चोरी

**पोलीस स्टेशन सावनेर** यातील फिर्यादी नामे रविशंकर लालकुमार यादव वय 25 वर्ष रा. ग्राम तिघई थाणा कोंड पोस्ट नोडीया ता. रावसगंज जि. सोनभद्र( उ.प्र.) ह.मु. अदानी कंपनी कर्मचारी निवासस्थान माळेगाव ता. सावनेर व त्याचे मित्र नामे— श्रवण बैगा और पप्पु यादव असे कंपनी मधुन काम करून रूमवर पायदळ मोबाईल फोनवर बोलत जात असता यातील नमुद तिन अनोळखी आरोपी जे अंगात काळया रंगाचे कपडे व जॉकेटे घातलेले वय अंदाजे २० ते २५ वर्षे असलेले यांनी फिर्यादीला अंधारात थांबवुन भोसडीके मोबाईल निकाल असें म्हणुण हातापाई करून रोडचे साईडाल नेवुन त्याचा मोबाईल रिअल मी कंपनीचा सी. ५३ मोडेल सिम क्र ९७७२४४७०९३ कि. ८,००० रू. हिसकावुन घेतला फिर्यादीने विरोध केला असता त्याचे छातीवर व उजव्या हाताचे बाहीवर चाकुने मारले व फिर्यादी चे खिशाची छडती घेतली असता त्याचे खिशात काहीही पैसे न मिळाल्याने फिर्यादीला सोडुन दिले व फियादीचे मागे येणारे त्याचे दोन्ही मित्रांना हातभुकीनी मारपीट करून धमकावुन त्याचे जवळील मोबाईल रिअल मी कंपनीचा सिम क्र. ७३९३०७२४५६ कि. अंदाजे ५,००० रू. व रेड मी कंपनीचा १० ऐ मोडेल सिमक्र.९५८०८५०९७३ कि. अंदाजे ४,००० रू. असे एकुण तिन मोबाईल एकुण कि. १७,००० रू. चे फिर्यादी व त्याचे दोन्ही मित्राला गंभीर दुखापत करून जबरदस्ती हिसकावुन नेलेवरून फिर्यादी व त्याचे दोन्ही मित्र उपचारा कामी श्रेयश पाटील हॉस्पीटल सावनेर येथे जावुन उपचार करून आज रोजी पो.स्टे. ला येवुन तोंडी रिपोर्ट दिल्यावरून गुन्हा नोंद.

सदर फिर्यादी तोंडी रिपोर्टवरून_पोलीस स्टेशन सावनेर येथे आप क्र १०८३/२३ कलम ३९४, ३४ भादवी अन्वये सदर आरोपी विरुद्ध गुन्हा नोंद करून तपासात घेतला गुन्हयाचा तपास सपोनि शिवाजी नागवे मो.क्र. 9823403565 हे करत आहेत.

## खुन

**पोलीस स्टेशन मौदा** यातील फिर्याद नामे विजय आनंदराव वाडीभस्मे वय ५८ व ़ा रा. माथनी ता.. मौदा पोलीस पाटील याच्या रिपोर्टवरून यातील आरोपी मृतक नामे प्रभाकर रामाजी गजभिये वय ७५ वर्ष रा. बेला ता. जिल्हा भंडारा ह. मु. प्रताप राजे वर वासनिक यांचे घरी माथनी ता. मौदा. जिल्हा नागपूर येथे राहत असून आरोपीला दम्याचा आजार होता.व त्याची पत्नी सौ विमला गजभिये ही सुदधा तीन महिन्यापासून आजारी असून पलंगावरच होती. तिचा देखभाल आरोपी मृतक हा स्वता करीत असल्याने तो वैतागून गेला होता. आरोपी मृतक नामे प्रभाकर रामाजी गजभिये याने लिहीलेल्या चिटटीवरून पत्नी सौ विमला गजभिये हिच्या आजाराला कंटाळून आरोपी मृतक याने तिचा खून करून स्वताहा गळफास घेवून आत्महत्या केली आहे. याबाबत सुसाईड नोटमध्ये उल्लेख असल्याने फिर्यादीच्या रिपोर्टवरून वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला आहे.

सदर गुन्हा यातील फिर्याद याच्या रिपोर्टवरून_पोलीस स्टेशन मौदा_येथे आप क्र ११८३/२३ कलम ३०२ भादवी अन्वये सदर आरोपी विरुद्ध गुन्हा नोंद करून तपासात घेतला गुन्हयाचा तपास_सपोनि निशा भूते मो क्र. ९८२२५६६१८० हे करत आहेत.

## चोरी

पोलीस स्टेशन खापरखेडा यातील फिर्यादी नामे सोहेल असलम शेख वय २१ वर्ष राहणार वार्ड क्रमांक तीन खापरखेडा हे सिंगम सिक्युरिटी सर्विसेस येथे सिक्युरिटी इन्चार्ज म्हणून काम करतात. दि ०२/१२/२०२३रोजी फिर्यादी हे सिक्युरिटी गार्ड फकीरचंद खांडेकर यांच्यासोबत फॅब्रिकेशन यार्ड भानेगाव मध्ये पेट्रोलिंग करीत असता यातील आरोपी क्र १) बालकृष्ण दादाराव गजभिये २) पप्पू शामराव डोंगरे दोन्ही राहणार जुना भानेगाव खापरखेडा हे लोखंडी चॅनल बाईकवर नेत असताना मिळून आल्याने त्यांचे जवळून मोटर सायकल क्रमांक एम एच ३१ बी टी ०५५७ किमती १०,००० रुपये व लोखंडी चॅनल अंदाजे १२५ किलो किमती ५००० रुपये असा एकूण १५,००० रुपयाचा माल चोरी करून नेत असताना मिळून आले.

सदर फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन खापरखेडा येथे आप क्र ७२२/२३ कलम३७९, ३४ भादवी अन्वये सदर आरोपी विरुद्ध गुन्हा नोंद करून तपासात घेतला सदर गुन्हयाचा तपास पोउपनि पीसे हे करत आहेत.

# रेती चोरी

दि.०२/१२/२०२३ रोजी ०३/१२/२३ चे ०७/०० वा ते ०७/४० वा दरम्यान फिर्यादी पोहवा /486 प्रदिप चवरे  हे स्टाफसह पोलीस स्टेशन उमरेडच्या हद्दीत पेट्रोलींग करीत असताना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशिर माहिती मिळाली की, एक पांढया रंगाचा टिप्पर अवैधरीत्या रेती भरून वाहतुक करीत आहे अशा खबरे वरून पो. हवा. प्रदिप व यांनी स्टाफसह वाघमारे हॉटेल येथे नमुद टिप्परास थांबवुन वाहनाची तपासणी केली असता टिप्पर क्र एम एच ४० बी एल ६१०१ मध्ये रेती भरलेली होती. वाहनचालकास रेतीच्या रॉयल्टी परवाना बाबत विचारले असता त्यांचेकडे  परवाना नसल्याचे समजले व चालकास अवैद्य रेतीची वाहतुक कोणाचे सांगण्यावरुन करतो याबाबत विचारपुस केली तेव्हा त्याने  रेती मालकाच्या सांगन्यावरून रेतीची वाहतुक करीत असलेबाबत सांगीतले. सदरबाबत पो.हवा. प्रदिप चवरे यांनी टिप्पर क्र एम एच ४० बी एल ६१०१ किमत १५,००,०००/— रू व त्या मधिल अंदाजे ०५ ब्रॉस रेती किंमत १५०००/— रू असा एकुण १५१५०००/— रू च्या माल जप्त पंचनाम्याप्रमाणे जप्त केली व आरोपींविरुध्द पो.स्टे. उमरेड येथे अप.क्र. ६८७/२३ कलम ३७९ १०९ भादवी सहकलम ४८ (८) महसुल अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोहवा/५७४ राधेशाम कांबळे हे करीत आहेत.